RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# भारतीय शेतमजूरांच्या समस्या

**प्रा. शाहूराज व्यंकटराव गायकवाड,** सहाय्य्ज प्राध्यापज , अर्थशास्त्र विभाग, श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांज्ली.
मोबा.-नं.९७६३०३६६४१

**प्रस्तावना -**

भारतीय अर्थव्यवस्था कृषी प्रधान असल्यामुळे शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जवळजवळ ६७ टक्के लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर आधारित आहे. भारताचा जवळपास ७० टक्के भाग हा ग्रामीण भागाने व्यापलेला आहे. या ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय शेती असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान आहे. भारतातील बहुसंख्य शेती निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाची अनुकूलता असेल तरच शेतीतून उत्पादन जास्त येते परंतु भारतात येणाऱ्या पावसाचे प्रमाण अनिश्चित व विषम असते. चेरापूंजी येथे प्रतिवर्षी सरासरी ४५० इंचापेक्षा जास्त पाऊस पडतो तर राजस्थानच्या वाळवंटात सरासरी ५ ते १० इंचापेक्षा कमी पाऊस पडतो. शिवाय ९० टक्के पाऊस मोसमात ४ ते ५ महिन्यात पडतो आणि राहिलेला १० टक्के पाऊस वर्षभर कधीतरी पडतो. शिवाय चक्रीवादळ, भूकंप, पिकावर पडणारे रोग यामुळे शेतीचे नुकसान होते. शेती क्षेत्रामध्ये कितीही शोध लागले असले तरी निसर्गाची साथ महत्वाची असते. अशा अनिश्चिततेने युक्त असलेल्या शेतीक्षेत्राला ग्रामीण भागातील लोकांना रोजगार पुरविण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. भारतातील ६० ते ७० टक्के शेतकरी सिमांत किंवा अल्पभूधारक या वर्गात मोडतात. अशा अल्पभूधारकांना देखील इतरांच्या शेतीवर मजूरी करण्यासाठी जावे लागते. ग्रामीण भागातील अत्यंत गरीब व सामाजिकदृष्ट्या मागास लोक भूमिहीन आहेत त्यांना शेतमजूरी हाच जगण्याचा प्रमुख आधार असतो. अर्थात शेतमजूरी हा भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगाराचा सर्वात मोठा हिस्सा आहे. शेती उत्पादन हे शेतमजूरांच्या कष्टावर अवलंबून असल्यामुळे कृषी अर्थशास्त्रात शेतमजूर हा घटक महत्वाचा मानला जातो.

**शेतमजूराची व्याख्या -**

शेतमजूर म्हणजे काय ? शेतमजूर कोणाला म्हणावे याबाबत वेगवेगळे तज्ज्ञ व चौकशी समितींनी वेगवेगळी मते मांडली आहेत.

**१) कृषी मजूर चौकशी समिती (१९५०-५१)**

"जे लोक शेतीच्या लागवडीमध्ये गुंतलेले असून त्यासाठी मोबदला म्हणून मजूरी घेतात अशा लोकांना शेतमजूर असे म्हणतात."

**२) ज़ृ षी मजूर चौकशी समिती (१९५६-५७)**

"शेतीमध्ये काम करणारे तर शेतमजूर असतातच शिवाय दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन इत्यादी पूरक व्यवसायातील लोकसुध्दा शेतमजूरांच्या गटात येतात."

**३) राष्ट्रीय श्रम आयोग**

"ज्या व्यक्ति अकुशल आणि असंघटीत असून उपजिविकेसाठी ज्यांच्या जवळ श्रम हेच साधन आहे त्यांना शेतमजूर म्हणतात."

**शोधनिबंधाची उद्दिष्टे -**

१) भारतीय शेतमजूरांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
२) शेतमजूरांच्या समस्या सोडविण्यासाठीच्या शासन स्तरावरील उपयांचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितके -**

१) शेती हेच शेतमजूरांच्या उपजिविकेचे साधन आहे.
२) शेतमजूरांना मिळणारे वेतन कमी असते.
३) शेतमजूरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनस्तरावर अनेक उपाय योजिले जातात.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत शोधनिबंध हा द्वितीय माहितीवर आधारीत आहे. दुय्यम सामग्रीमध्ये विविध संदर्भग्रंथ मासिजे वर्तमापनत्रातील लेख व वेबसाईटस् इत्यादींचा आधार घेण्यात आलेला आहे.

**शेतमजूरांच्या संख्येतील वाढ -**

भारतामध्ये शेतमजूरांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. शेतमजूरांच्या संख्येत वाढ होण्याची जी विविध कारणे सांगितली जातात त्यापैकी वाढती लोकसंख्या, ग्रामोद्योग व कुटीरोद्योगांचा ऱ्हास, विभक्त कुटुंब पध्दती इत्यादी प्रमुख कारणे आहेत.

पुढील तक्त्यामध्ये १९५१ ते २०११ या काळात शेतमजूरांच्या संख्येत झालेली वाढ दाखविण्यात आलेली आहे.

**तक्ता १**

**शेतमजूरांची संख्या (दशलक्षात)**

| **वर्ष** | **एकूण लोकसंख्या** | **वाढीचा दर** | **ग्रामीज लोज संज्या** | **शेतमजूर** |
|---|---|---|---|---|
| १९५१ | ३६१.१ | १.२५ | २९८.६ | २८.० |
| १९६१ | ४३९.२ | १.९६ | ३६०.३ | ३२.० |
| १९७१ | ५४१.२ | २.२२ | ४३९.६ | ४८.० |
| १९८१ | ६१३.३ | २.२० | ५२३.९ | ५५.५ |
| १९९१ | ८४६.४ | २.१४ | ६२८.९ | ७४.७ |
| २००१ | १०२८.७ | १.९५ | ७४२.६ | १०७.४ |
| २०११ | १२१०.८ | १.७६ | ८३३.४ | १४४.३ |

Source : Population Census Report 1951 to 2011

१९५१ मध्ये भारतातील एकूण लोकसंख्या ३६१.१ दशलक्ष होती. ती २०११ मध्ये १२१०.८ दशलक्ष झाली. या लोकसंख्येमध्ये ग्रामीण लोकसंख्या १९५१ मध्ये २९८.६ दशलक्ष होती. तर २०११ मध्ये ती ८३३.४ दशलक्षपर्यंत वाढली. १९५१ ला २८.० दशलक्ष शेतमजूर होते आणि त्यामध्ये वाढ होऊन २०११ ला १४४.३ दशलक्ष इतकी शेतमजूरांची संख्या झाली. यावरुन शेतमजूरांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे असे दिसून येते.

**भारतीय शेतमजूरांच्या समस्या -**

भारतीय शेतमजूर अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगतात. औद्योगिक क्षेत्रातील मजूर साक्षर व संघटीत असतात. त्यांची सौदाशक्ती शेतमजूरांच्या तुलनेने अधिक असते. कारण शेतमजूर हे निरक्षर, अप्रशिक्षित शिवाय असंघटीत असतात. त्यामुळे त्यांना अतिशय अल्प वेतनावर काम करावे लागते. त्यांना औद्योगिक कामगाराप्रमाणे भविष्यनिर्वाह निधी, विमा योजना, अपघात प्रसंगी मदत, साप्ताहिक सुट्टी अशा सवलती शेतमजूरांना मिळत नाहीत त्यामुळे शेतमजूरांची परिस्थिती खालावते. भारतातील शेतमजूरांच्या आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक हालाखीची कारणे किंवा त्यांच्या समोरील समस्या पुढील मुद्यांद्वारे स्पष्ट करता येतील.

**१) हिन सामाजिक दर्जा -** शेतमजूरापैकी बहुतेक लोक हे वर्षानुवर्षे शोषण झालेल्या अनुसूचित जाती-जमाती, पद दलित या वर्गातील आहेत. त्यांचे हक्क काय आहेत याची त्यांना एकतर जाणीव नाही किंवा समाजातील उच्चवर्गाच्या विरोधात जाऊन हक्क मागण्याची त्यांची वृत्ती दाबली गेली आहे. त्यामुळे हा वर्ग मूकपणे अन्याय, अत्याचार सहन करीत हालाखीमध्ये जीवन जगतो. संसदेमध्ये मांडण्यात आलेल्या अहवालानुसार १९९५ ते २००१ या काळात खून झालेल्या मागासवर्गीयांची संख्या ३७२८ इतकी होती तर १९९९-२००० मध्ये जवळपास २५ हजार इतक्या अत्याचाराचे दावे नोंदले गेले. अशा प्रकरणातील न्यायालयीन दावे दीर्घकाळ प्रलंबित राहतात.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**२) असंघटीतपणा -** शहरी किंवा औद्योगिक कामगाराप्रमाणे शेतमजूर संघटीत नाहीत. त्यामुळे शेतमजूरांची सौदाशक्ती कमी आहे. भारतीय शेतीचे स्वरुप आणि मजूरांच्या मागणीचे स्वरुप यामुळे त्यांचे संघटन होण्यात अडचणी निर्माण होतात. अशाही परिस्थितीत केरळच्या शेतमजूरांनी संघटीत होऊन आपल्या वेतनामध्ये वाढ करुन घेतल्याचे उदाहरण आपल्यासमोर आहे.

**३) हंजामी बेज ारी -** शेतमजूरांना वर्षातील सर्व दिवस काम मिळत नाही, त्यांना हंगामी बेकारीत म्हणजे हंगामाच्या कालावधीत काम मिळते व बाकीचे ४ ते ५ महिने बेकारीत जीवन जगावे लागते. या काळात उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत बंद झाल्याने हालाखीत दिवस काढण्याचा प्रसंग त्यांच्यावर येतो.

**४) कमी मजूरी -** शेतमजूरांना दिवसातील आठ किंवा काही ठिकाणी अधिक तास काम करुनही अतिशय कमी वेतन दिले जाते. कामाचे तास, कामाची परिस्थिती, सुट्ट्यांचा अभाव इत्यादी परिस्थिती पाहता शेतमजूरांच्या मजूरीचा दर जास्त असायला हवा. या संदर्भात सरकारने केलेल्या किमान वेतनाच्या कायद्यांचे नीट पालन होत नाही. त्यामुळे शेतमजूरांचे उत्पन्न कमी राहते.

**५) पर्यायी रोजगाराची कमतरता -** शेतीचा हंगाम संपल्यानंतर इतरवेळा व्यवसाय किंवा मजूरी मिळवून देणाऱ्या पर्यायी व्यवसायाची ग्रामीण भागात कमतरता आहे. तसेच शेतमजूर रोजगार मिळविण्यासाठी आपले गांव सोडून शहरात जाण्यास तयार नसतात. अशावेळी हाताला काम मिळवून देणारे ग्रामोद्योग व कृषीउद्योग ग्रामीज भागात उभे केले तर त्यांना बेकारीच्या काळात काम मिळेल. दुर्दैवाने नियोजन काळात या पैलूकडे पुरेसे लज न दिले गेल्याने शेतमजूरांची परिस्थिती हालाखीची बनली. त्यांच्या समस्यांमध्ये वाढ झाली.

**६) अनुत्पादक खर्च -** शेतमजूर हा गरीब असला तरी तो ज्या समाजात राहतो त्या समाजाचा एक घटक आहे. त्यामुळे समाजाचे रितीरिवाज, वाढदिवस, लग्न, सणवार, बारशापासून तेराव्यापर्यंतचे विधी, घरी आलेल्या पाहुण्यांचा आदर सत्कार, नातलग, मित्र यांच्या सुख-दु:खासाठी करण्यात येणारा खर्च हा अनुत्पादक स्वरुपाचा असतो. हा खर्च मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे उत्पन्न व खर्च यामध्ये मेळ घालण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. बऱ्याचवेळा कर्ज घ्यावे लागते.

**७) कर्जबाजारीपणा -** शेतकरी आणि शेतमजूरांच्या संदर्भात म्हटले जाते की, भारतीय शेतमजूर किंवा शेतकरी हा कर्जात जन्माला येतो, कर्जात जीवन जगतो आणि कर्जातच मरतो. शेतमजूरांना मिळणारे अल्पवेतन आणि अमाप खर्च त्यामुळे खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी सावकाराकडून भरमसाठ व्याजदराने कर्ज घेतले जाते. घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेवर करता आली नाही तर व्याज आणि कर्ज यांच्या सापळ्यात शेतमजूर अडकतो व त्याचे घर, जमीन किंवा इतर मालमत्ता सावकाराकडून जप्त केली जाते.

**८) ग्रामीण उद्योगाचा ऱ्हास -** ब्रिटीशपूर्व भारतात विदेशाला पाठविता येतील अशा अनेक वस्तूचे उत्पादन करणारे ग्रामीण उद्योग अस्तित्वात होते. पण भारतात ब्रिटीश आले आणि त्यांच्या धोरणामुळे भारतातील ग्रामीण व कुटीरोद्योग बंद पडले. मोठ्या भांडवलप्रधान उद्योगात तयार होणाऱ्या वस्तू लोकांना आकर्षक करु लागल्या. ग्रामीण उद्योगात तयार होणाऱ्या वस्तूची मागणी कमी होऊन असे उद्योग बंद पडले. अशा ग्रामीण उद्योगातून बेकार झालेल्या लोकांनी शेतमजूर काम स्विकारले. परिणामी पूर्वीपेक्षा शेतमजूरांच्या संख्येत वाढ झ ाली. सुप्त बेकारीचे प्रमाण शेतीक्षेत्रात वाढू लागले.

**९) शेतमजूरांची निरक्षरता -** शेतमजूरामध्ये साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे. निरक्षरतेमुळे अज्ञान व अंधश्रध्दा याचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे अनावश्यक खर्च जास्त केला जातो. हा खर्च भागविण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेतात. सावकार त्यांच्या निरक्षरतेचा फायदा घेऊन कर्ज-व्याज याच्या मोबदल्यात त्यांची मालमत्ता काबिज करतात.

**१०) वेठबिगारी पध्दत -** शेतमजूराने सावकाराच्या कर्जाची परतफेड वेळेवर न केल्यास गावातील सावकार शेतमजूरांना आपल्याकडे बिगारीने ठेवतात यालाच वेठबिगारी असे म्हणतात.

सावकाराकडून कर्ज घेताना स्वत: किंवा आपल्या मुलाला सावकाराकडे गहाण ठेवले जाते. या काळात सावकार त्या व्यक्तिला आपल्या घरातील किंवा शेतामधील सर्व कामे करण्यास भाग पाडतो. घेतलेल्या कर्जाचा

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

व्याजदर २५ ते ५० टक्के असल्याने ते कर्ज परतफेड होऊ शकत नाही. परिणामी, पुढच्या पिढीला देखील वेठबिगारीत जीवन जगावे लागते.

**भारतीय शेतमजूरांच्या समस्या सोडविण्यासाठी योजिलेले शासकीय उपाय -**

**१) किमान वेतन कायदा - १९४८** - १९४८ च्या कायद्यानुसार प्रत्येक राज्य सरकारला स्थानिक खर्च व जीवनमान लक्षात घेऊन शेतमजूरांचे किमान मजूरी दर निश्चित करण्यास सांगितले. आज वेगवेगळ्या ठिकाणी मजूरीचे दर वेगवेगळे आहेत. काही ठिकाणी किमान वेतनापेक्षा शेतमजूरीचे दर कमी आहेत. शेतमजूरांच्या वेतनात वाढ करण्यास हा कायदा अयशस्वी ठरला असे म्हणता येईल.

**२) सहकारी समितीची स्थापना -** दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शेतमजूरांसाठी सहकारी समित्या स्थापन ज रज्यास प्रोत्साहन देण्यात आले. रस्ते बांधणे, कालवे खोदणे, तलाव निर्मिती, वृक्षारोपण इत्यादी सरकारी कामाचा ठेका या समित्याकडून घेतला जात असे व हंगामेत्तर काळात शेतमजूरांना काम उपलब्ध करुन देत असे.

**३) रोजगार हमी योजना -** १९७५-७६ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र सरकारने ही योजना सुरु केली. ज्या व्यक्तीला रोजगार पाहिजे अशा व्यक्तीने जिल्हाधिकारी किंवा तहसिल कार्यालयात अर्ज केल्यानंत ५ जि.मी. परिघाच्या आत संबंधित व्यक्तीला रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. २००५ मध्ये केंद्र सरकारने रोजगार हमी कायदा पास केला. या कायद्यानुसार प्रत्येक बेरोजगार कुटुंबाला वर्षातून किमा-न १०० दिवस काम पुरविण्याचे वचन देण्यात आले.

**४) वेठबिगारी पध्दती रद्द -** वेठबिगारी ही भारतीय समाजावरील एक कलंक होता. राष्ट्रपतीने वटहुकूम जारी करुन २५ ऑक्टोबर १९७५ पासून ही प्रथा बंद केली. या कायद्यानुसार वेठबिगारांचा शोध घेणे, त्यांना मुक्त करणे, त्यांचे पुनर्वसन करणे ही राज्य सरकारची जबाबदारी बनली. सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये वेठबिगारांच्या पुनर्वसनासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

**५) कमाल जमीन धारण व इतर कायदे -** जमीनदारी पध्दतीचे उच्चाटन करणे, कमाल जमीन धारणा कायदा, कुळ कायदा, कमाल जमिनीचे कुळ व भूमिहिनामध्ये वाटप करणे इत्यादी ज ायद्यामुळे भारताच्या निरनिराळ्या घटक राज्यातील शेतमजूरांची स्थिती सुधारण्यास मदत झाली.

**६) लघु व ग्रामोद्योगांचा विकास -** वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनांमध्ये लघु व कुटीरोद्योगांच्या विकासाला चालना देण्यासाठी अनेक उपाययोजना व सवलती बहाल करण्यात आल्या. शेतमजूरांचे दारिद्रय दूर करण्यासाठी अशा बेकार शेतमजूरांना वराहपालन, कुक्कुटपालन, पशुपालन, दुग्धव्यवसाय व इतर व्यवसाया संदर्भात प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. शिवाय अशा प्रशिक्षित शेतमजूरांना अल्प व्याजदराने कर्जपुरवठा केला जाऊ लाजला.

अशाप्रकारे केंद्रशासन व राज्यशासन यांच्याकडून भारतीय शेतमजूरांच्या समस्या सोडविण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक उपाययोजना केले जात आहेत.

**संदर्भग्रंथ -**

१) वाणी निता, कृषी अर्थशास्त्र, द्वितीय आवृत्ती, २०१५, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, पृष्ठ-१३४, १३५
२) कविमंडल विजय, कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था, सहावी आवृत्ती, २०१२, मंगेश प्रकाश, नागपूर, पृष्ठ-३७५
३) पाटील जे. एफ., अर्थदर्शन, प्रथमावृत्ती, २००५, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ - २१४
४) देसाई - भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, आठवी आवृत्ती, २००८, निराली प्रकाशन, पुणे, पृष्ठ - १८.४
५) चौधरी मनिषा, शेती क्षेत्रातील मजूरांचा तुटवटा (अर्थसंवाद), ऑक्टोबर - डिसेंबर २०१६, खंड ४०, अंक ३, पृष्ठ - ३०४
६) Singh H.P., Problems of Agricultural Labour in India (2015)
७) http://m.jagranjosh.com
८) http://www.economicsdiscussion.net